MHBI080000882012

## नि.दि.दा.क्र. ८८/२०१२ मधील निशाणी क्र. १२५ खालील आदेश

वादींनी सदरचा अर्ज मयत प्रतिवादी क्र.५ शेख जिलानी याचे वारस अभिलेखावर घेण्यासाठी दाखल केला आहे. त्याने सदरच्या अर्जात कथन केले आहे की, प्रतिवादी क्र.५ हा ता.२७.१२.२०२१ रोजी मयत झाला असुन त्याला जमील शेख जिलानी, अखील शेख जिलानी, अजीज शेख जिलानी व अखतर बेगम शेख जिलानी हे वारस आहेत. त्यामुळे त्यांची नावे दाव्यात प्रतिवादी क्र.५ चे वारस म्हणुन समाविष्ट करण्यास व त्याबाबत दुरुस्ती करण्यास त्याने परवानगी मागितली आहे. म्हणून त्यांनी त्यांचा अर्ज मंजूर करण्याची विनंती केली आहे.

२. सदरचे अर्जास प्रतिवादींनी जबाब दिलेला असून त्यामध्ये म्हटले आहे की, सदरचे अर्जास त्यांची हरकत असुन सदरचा अर्ज कायदेशीर नाही व त्यामुळे तो रद्द होण्यास पात्र आहे.

३. वर नमूद केलेल्या कथनांचा विचार करुन माझे विचारार्थ खालील मुद्दे आहेत व त्या मुद्दयावर मी माझे कारणांसह निष्कर्ष नोंदवित आहे.

| | मुद्दे | | निष्कर्ष |
|---|---|---|---|
| १. | सदरचा अर्ज मंजूर करणे आवश्यक आहे काय ? | ... | होय. |
| २. | आदेश काय ? | .. | अंतिम आदेशाप्रमाणे |

### कारणमिमांसा

### मुद्दा क्र. १ बाबत

४. मी वादींतर्फे विद्वान वकील श्री. गजमल व प्रतिवादींतर्फे विद्वान वकील श्री. इनामदार यांचा युक्तिवाद ऐकला. तसेच सदरच्या प्रकरणांमधील संबंधीत दस्तऐवज पाहिले. प्रतिवादी क्र.५ हा ता. २७.१२.२०२१ रोजी मयत झाल्याचे दिसुन येते. प्रतिवादी क्र.५ याचे वारस वर नमुद केल्याप्रमाणे असल्याचे दिसुन येते. वादीला प्रतिवादी क्र.५ च्या वारसांविरुध्द सदरचा दावा चालविण्यचा अधिकार आहे. त्यामुळे प्रतिवादी क्र.५ च्या वारसांची नावे मयत प्रतिवादी क्र.५ चे वारस म्हणुन दाव्यात समाविष्ट करण्यास परवानगी देणे आवश्यक आहे. त्यामुळे सदरचा अर्ज मंजूर करणे आवश्यक आहे. म्हणून मी मुद्दा क्र. १ चे उत्तर होकारार्थी नोंदवित आहे.

## मुद्दा क्र. २ बाबत

५. मी वर नमुद केल्याप्रमाणे सदरचा अर्ज मंजूर करणे आवश्यक आहे. म्हणुन मी मुद्दा क्र. २ चे उत्तरासाठी खालील अंतिम आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

सदरचा निशाणी क्र.१२५ चा अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

Digitally signed by SOPAN D GHANWAT
Date: 2023.06.06 15:55:43 +0530

दिनांक – ०६/०६/२०२३ (सो. द. घनवट)

दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर, माजलगाव.

**शेरा**

मी शपथेवर सांगतो की, या पी.डी.एफ. आदेश फाईल मधील मजकूर हा मूळ आदेशातील मजकूराशी शब्द न शब्द सारखा आहे.

| | | |
|---|---|---|
| लघुलेखकाचे नाव | – | श्री. हनुमंत बळवंतराव सूर्यवंशी |
| कोर्टाचे नाव | – | दि.न्या.व.स्तर, माजलगाव |
| न्यायनिर्णयाचा मजकूर सांगितल्याचा दिनांक | – | ०६/०६/२०२३ |
| न्यायनिर्णय टंकलिखित केलेला दिनांक | – | ०६/०६/२०२३ |
| न्यायनिर्णय स्वाक्षरीत केल्याचा दिनांक | – | ०६/०६/२०२३ |
| न्यायनिर्णय अपलोड केल्याचा दिनांक | – | ०६/०६/२०२३ |

स्वाक्षरीत/–

दिनांक – ०६/०६/२०२३

(ह. ब. सूर्यवंशी)
लघुलेखक ग्रेड – २,
दिवाणी न्यायालय व. स्तर, माजलगाव